आर्थिक गुन्हे शाखा

पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

वृत्तपत्र

दि.२२/०७/२०२६

पी.ए.सी.एल. लिमिटेड (पेरल ॲग्रोटेक कार्पोरेशन लिमीटेड), सातारा या कंपनीमध्ये आर्थिक गुंतवणूक केलेल्या ठेवीदारांना जाहीर आवाहन

---

पी.ए.सी.एल. लिमिटेड (पेरल ॲग्रोटेक कार्पोरेशन लिमीटेड), सातारा या कंपनीमध्ये आर्थिक गुंतवणूक केलेल्या ठेवीदारांची फसवणूक झाल्याबाबत शाहुपुरी पोलीस ठाणे येथे गु.नो.क्र. ६३/२०१४ , कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ भा.दं.सं., सह कलम ३ व ४ एम.पी.आय.डी कायदा, १९९९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा कडे पुढील तपासकामी वर्ग करण्यात आल्याने सदर गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरु आहे.

या गुन्हयातील कंपनीमध्ये ठेवीदांर यांनी गुंतवलेल्या रक्कमा परत करणेसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये न्यायमुर्ती आर.एम. लोढा समितीची स्थापना सन २०१६ मध्ये झाली होती.

नोडल अधिकारी तथा सचिव, न्यायमुर्ती (सेवानिवृत्त) आर.एम.लोढा समिती यांनी त्यांच्या दि.०६/०७/२०२६ च्या पत्राअन्वये कळवीले आहे की, मा. सर्वोच्च न्यायालय येथे सी.टी.ए. नं. १३३०१/२०१५ अन्वये सुब्राता भटाचार्य विरुद्ध सेबी व इतर प्रमाणे दाखल खटल्यात मा. न्यायालयाने निवृत्त न्यायाधीश श्री. आर.एम. लोढा यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्याचे निर्देश दिले होते. या कंपनीचे गुंतवणूकदार संपुर्ण भारतात असल्याने www.sebipaclrefund.co.in ही वेब पोर्टल तयार करण्यात आली होती आणि त्याद्वारे परतावा परत देण्याची प्रक्रिया सुरु करण्याल आली आहे. परताव्याची सद्यस्थिती समजण्यासाठी https://www.sebipaclrefund.co.in/Refund/Enquiy हे वेब पोर्टल सुरु करण्यात आले आहे.

त्यांनी असेही जाहिर केले आहे की, काही तांत्रीक कारणाने ज्या गुंतवणूकदारांना ठेवी परत मिळाल्या नाहीत त्यांनी दि.०६/०८/२०२६ रोजी पर्यंत https://www.sebipaclrefund.co.in येथे लॉग इन करुन त्रुटी दुर करावी.

या पार्श्वभूमीवर असे आवाहन करण्यात येते की, पी.ए.सी.एल. लिमिटेड (पेरल ॲग्रोटेक कार्पोरेशन लिमीटेड) या कंपनीमध्ये गुंतवणूक केलेल्या ठेवीदांरांनी वरील वेबसाईट तसेच त्यांच्या काही अडचणी असल्यास त्यांनी नोडल अधिकारी तथा सचिव, न्यायमुर्ती (सेवानिवृत्त) आर.एम.लोढा समिती, सेबी भवन, प्लॉट नं. सी४-ए, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई येथे संपर्क करावा.

---